# महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळातील उप प्रादेशिक अधिकारी (गट अ) संवर्गातील नामनिर्देशनाची रिक्त पदे भरण्यासाठी विहीत अर्हता धारण करीत असलेल्या पात्र उमेदवारांकडून स्पर्धात्मक परिक्षेसाठी केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याची सुविधा मंडळाच्या www.mpcb.gov.in व MKCL यांच्या http://oasis.mkcl.org/mpcb2014 या संकेतस्थळांवर उपलब्ध राहील. तसेच सदर जाहिरात म. प्र. नि. मंडळाच्या संकेतस्थळावर दि. ०८/१२/२०१४ ते २८/१२/२०१४ पर्यंत उपलब्ध राहील.

**ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात दिनांक ०८/१२/२०१४ सकाळी ११.०० पासून**

**ऑनलाईन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक २८/१२/२०१४ संध्याकाळी ५.०० पर्यंत**

भरती प्रक्रिये संदर्भातील सर्व कार्यक्रम, कार्यप्रणाली व सूचना मंडळाच्या www.mpcb.gov.in व http://oasis.mkcl.org/mpcb2014 या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील. भरती प्रक्रिये संदर्भातील अंतिम निर्णयाचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम राहील.

**रिक्त पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे**

| अ. क्र. | पदाचे नाव व वेतनश्रेणी | रिक्त पदांची संख्या | सामाजिक आरक्षण | समांतर आरक्षण |
|---|---|---|---|---|
| १ | उप प्रादेशिक अधिकारी (गट अ)<br>पी बी: ३, १५६००—३९१००,ग्रेड वे. ५४०० | १३ | अ.जा. २,<br>अ.ज. १<br>वि.ज.(अ) /भज(क)/ भज(ड), २<br>इ. मा. व. २<br>खुला ६ | खुल्यासह सर्व प्रवर्गातून<br>महिला: ४ |

१.२ वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे.

१.३ वर दर्शविण्यात आलेल्या समांतर आरक्षणाचा पात्र उमेदवार प्राप्त न झाल्यास त्याच राखीव प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांचा समुचित शासन नियमानुसार विचार केला जाईल.

१.४ वि.ज.(अ), भज(क), भज (ड) या प्रवर्गाकरीता विहीत केलेले आरक्षण त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनीय राहील.

१.५ भरती प्रक्रीये संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतीम निर्णय घेण्याचा अधिकार अध्यक्ष, म. प्र. नि. मंडळ, मुंबई यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतीम असेल.

१.६ शासन निर्णय महिला व बालविकास विभाग क्र. ८२/२००१/म.से.आ.२०००/प्र.क्र.४१५/का२,दि. २५/०२/२००१(सहपत्र १२ व १३) अन्वये महिलांसाठी ३० टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. (महाराष्ट्र राज्याचे अधिवासी आणि उन्नत व प्रगत गटात मोडत असलेल्या जागेवर फक्त). महिला उमेदवार ज्यांना खुल्या प्रवर्गातील महिलाच्या आरक्षणाचा लाभ घ्यायचा असेल त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे अद्यावत वैध असलेले सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. महिलांच्या नावात बदल असल्यास त्यांनी राजपत्राची प्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

## २. शैक्षणिक अर्हता व अनुभव

**उप प्रादेशिक अधिकारी (गट अ) :**

१. मान्यताप्राप्त विद्यापीठ/संस्थेतील अभियांत्रिकी शाखेतील पदवी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केलेली असावी.

किंवा

मान्यताप्राप्त विद्यापीठ/संस्थेतील पर्यावरण विज्ञान (Environmental Science) अथवा समकक्ष शाखेतील पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण असावा.

२. वरील अर्हता धारण केल्यानंतर ३ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा अनुभव असावा.

३. मंडळाच्या/शासनाच्या सेवेत नसल्यास उमेदवाराचे वय ३५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**३. पात्रताविषयक अटी :**

३.१ उमेदवार हा भारतीय नागरिक व महाराष्ट्र राज्याचा मागील १५ वर्षापासून अधिवासी असावा.

३.२ उमेदवाराला मराठी भाषा वाचता, बोलता, लिहिता व समजण्या इतपत ज्ञान असावे.

३.३ उमेदवार विवाहित असल्यास, शासन अधिसूचना महाराष्ट्र नागरी सेवा नियम २००५, दि. २८ मार्च २००५ मधील तरतुदीनुसार उमेदवाराने लहान कुटुंब असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र विहित नमुन्यात अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. अविवाहित असल्यास लागू नाही असे नमूद करुन प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करावे.

३.४ महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.मकसी—१००७/प्र.क्र.३६/का. ३६ दि. १० जुलै,२००८ नुसार महाराष्ट्र कर्नाटक सीमा विभागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावातील मराठी भाषिक उमेदवारांना वरील पदासाठी अर्ज करता येईल. मात्र त्यांनी सदर ८६५ गावातील १५ वर्षाचे वास्तव्य असलेल्या रहिवासी असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्यांचा विहित नमुन्यातील दाखला सादर करणे अनिवार्य राहील.त्यानुसार उमेदवार हा महाराष्ट्र राज्यातील सर्वसाधारण अधिवासी असणे आवश्यक आहे.

३.५ मागासवर्गीय व इतर प्रवर्गाबाबत उच्च वयोमर्यादा संबधित शासन नियमाप्रमाणे लागू राहील.

**४. सर्वसाधारण सूचना:**

१ उमेदवारांनी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.प्रशसन—२०००/प्र.क्र.५/२००१/३२, दि. २० जुलै,२००२ व दि. १९ मार्च २००३ अन्वये संगणक हाताळणी/वापराबाबतचे प्रमाणपत्र (एम.एस.सी.आय.टी) त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाच्या आत सादर करणे आवश्यक राहील अन्यथा त्यांची सेवा कोणतिही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येईल. अथवा शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान (सामान्य प्रशासन विभाग) विभाग क्रमांक मातंस २०१२/प्र.क्र.२७७/३९,दि. ०४ फेब्रुवारी २०१३ अन्वये विहित केलेली संगणक अर्हता उमेदवाराने प्राप्त केलेली असावी.

२ महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निराधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती,विशेष मागास प्रवर्ग,इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१(सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ८) महाराष्ट्र शासनाने दि. २९ जानेवारी २००४ पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्व वि. जा. (अ), भ. ज. (ब), भ. ज. (क), भ. ज. (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांची जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे अद्ययावत वैध असलेले (नॉन–क्रिमीलेअर) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच खुल्या प्रवर्गातील महिलांनी (जाहिरातीत नमूद महिला आरक्षणाच्या पदांच्या बाबतीत) सदर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

३ अनुभवाच्या बाबतीत तासिका तत्वावर शिकाऊ उमेदवाराने अर्धवेळ, विनावेतन, अतिरिक्त कार्यभार, प्रभारी पदावरील अनुभव ग्राह्य धरला जाणार नाही.

४ विहित वयोमर्यादेतील शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालय प्रमुखांच्या शिफारशीनुसार नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या परवानगीने भरावे व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी.

५ अर्ज पूर्णपणे भरलेला असावा. विहीत नमुन्यात नसलेले व अर्ज फेटाळण्यात येतील.

६ आरक्षित पदांकरिता निवड झालेल्या उमेदवारांना जात प्रमाणपत्र समितीने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र विहीत मुदतीत सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

७ संबधित पदाकरिता आवश्यक असलेल्या अटी, शर्ती व पात्रतेचे निकष पूर्ण करीत नसलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

८ उमेदवाराने विहीत नमुन्यातील अर्जावर विहीत ठिकाणी एक पासपोर्ट आकाराचे छायाचित्र स्कॅन करून लावावे.

९ निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही वेळी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती/अगर कागदपत्रे खोटी/बनावट सादर केल्याचे किंवा माहिती दडवून ठेवल्याचे आढळल्यास किंवा गैरवर्तन करतांना अथवा दबाव तंत्राचा वापर करतांना आढळल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी/नियुक्ती कोणतिही पूर्वसूचना न देता रद्द/समाप्त करण्यात येईल.

१० एखाद्या उमेदवाराने त्याच्या निवडीसाठी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्या उमेदवारास निवड प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यात येईल.

११ या संर्दभात उद्‌भवणारे न्यायालयीन दावे मुंबई जिल्हा न्यायालयाच्या कार्यकक्षेत राहतील.

१२ सदर जाहिरातीतील पदे भरण्यास प्रशासकीय किंवा तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास, कार्यवाही स्थगित वा रद्द करण्याचे अधिकार मंडळाकडे राहतील.

**१३ निवड समितीने प्रत्येक पदाकरिता तयार केलेल्या निवड सूचीची विधीग्राह्यता निवडीच्या तारखेपासून १ वर्षाकरिता राहील. त्यानंतर सदर निवड सूची नियमाप्रमाणे व्यपगत होईल.**

१४ या जाहिरातीमध्ये नमूद केलेले सर्व शासन निर्णय व परिपत्रके महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**५. परीक्षा शुल्क**

| | |
|---|---|
| **सर्व प्रवर्गा करिता** | रु ४०० |

**६. ऑनलॉईन अर्ज करण्याची पध्दत :—**

१. सर्व पात्र उमेदवारांनी अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत www.mpcb.gov.in किंवा MKCL यांच्या http://oasis.mkcl.org/mpcb2014 या संकेतस्थळावर अर्ज करावेत.

२. स्वत:चा मोबाईल नंबर व ईमेल आयडी काळजीपूर्वक भरावा. अर्ज करतांना प्रमाणपत्र जोडणे आवश्यक नाही. तथापि, ऑनलॉईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. अर्ज भरतांना काही त्रुटी राहिल्यास संगणक अर्ज स्वीकारणार नाही. त्यामुळे उमेदवाराने अचूक व परिपूर्ण अर्ज भरण्याची दक्षता घ्यावी.

३. उमेदवाराने सोबत परिशिष्ट "ब" मधील सूचनांनुसार प्रथम स्वत:चे छायाचित्र व स्वाक्षरी स्कॅन करावी. उमेदवाराने प्रथम स्वत:चे छायाचित्र व स्वाक्षरी स्कॅन करुन अपलोड करावी. असे करतांना ऑनलॉईन जाहिरातीत नमूद केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा उमेदवाराचा अर्ज अपात्र ठरणार, याची नोंद घ्यावी.

अ) उमेदवाराने अर्ज भरण्यासाठी www.mpcb.gov.in किंवा MKCL यांच्या http://oasis.mkcl.org/mpcb2014 या संकेतस्थळावर जाऊन ऑनलॉईन अर्ज भरण्याची लिंक उघडावी.

ब) अर्ज काळजीपूर्वक भरावा. उमेदवार एकचवेळी अर्ज भरु न शकल्यास त्याने सदर अर्ज भरलेल्या माहितीसह सेव्ह (save) करावा. माहिती सेव्ह होताच, नोंदणी क्रमांक व पासवर्ड आपोआप निर्माण होऊन तो स्क्रीनवर दिसेल. अर्जदाराने सदर नोंदणी क्रमांक व पासवर्डची योग्य ती नोंद घ्यावी. नोंदणी क्रमांक व पासवर्ड अर्जदारास एसएमएस व ई–मेल द्वारे कळविण्यात येईल. अर्जदारास सेव्ह केलेली माहिती नोंदणी क्रमांक व पासवर्डचा वापर करुन आवश्यकतेनुसार पुन्हा उघडता येईल. व नव्याने तपशिलाचे संकलन/सुधारणा करता येईल. मात्र ही सुविधा फक्त तीन वेळाच वापरता येईल. संपूर्ण व अचूक माहिती भरुन झाल्यावर उमेदवाराने अर्ज सादर (upload) करावा.

४. प्रस्तुत पदांकरिता फक्त अधिकृत संकेतस्थळावरुन विहीत पध्दतीने भरण्यात आलेले ऑनलॉईन अर्जच स्वीकारले जातील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

५. पात्र उमेदवाराला वेब–बेस्ड (web based) ऑनलॉईन अर्ज www.mpcb.gov.in किंवा MKCL यांच्या http://oasis.mkcl.org/mpcb2014 या संकेतस्थळाद्वारे दि.०८/१२/२०१४ ते २८/१२/२०१४ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

६.	ऑनलॉईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना www.mpcb.gov.in व MKCL यांच्या http://oasis.mkcl.org/mpcb2014 या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

७.	ऑनलॉईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराचा स्वत:चा चालू ई—मेल आयडी असणे व भरतीची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीपर्यंत सदर ई—मेल आयडी चालू असणे आवश्यक आहे. पुढील सर्व पत्रव्यवहार उमेदवाराने ऑनलॉईन अर्जात नमूद केलेल्या ई—मेल आयडी द्वारे होणार असल्याने याबाबत दक्षता घ्यावी,अन्यथा याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही.

८.	ऑनलॉईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर संकेतस्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

९.	ऑनलॉईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन पात्र उमेदवारांची यादी, परिक्षेची रुपरेषा/वेळापत्रक/परीक्षा केंद्र/आसन क्रमांक ईत्यादीबाबतची माहिती वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर उपलब्ध राहील. याबाबत स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१०.	सदर संपूर्ण भरती प्रक्रियेदरम्यान वर नमूद संकेतस्थळाला वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची अद्ययावत माहिती जाणून घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

**७ निवडीचे निकष**

१)	ऑनलॉईन / लेखी परीक्षा MCQ (Multiple Choice Question) या प्रकारे घेण्यात येणार असून एकंदर ८० प्रश्न विचारण्यात येतिल. प्रत्येक प्रश्नास एक गुण असून परीक्षेचा कालावधी ७५ मिनीटांचा असेल.

२)	उमेदवाराचा गुणवत्ता यादीत अंतर्भाव होण्यासाठी ऑनलॉईन/लेखी परीक्षेत एकूण गुणांच्या किमान ५० टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील. सदर निकषानुसार पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास निकष शिथील करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहतील.

३) पदासाठी विहीत केलेल्या अर्हता/अटी/शर्ती पूर्ण करणाऱ्या पात्र उमेदवारांची सदर परीक्षेत प्राप्त गुणांच्या आधारे बनविलेल्या गुणवत्ता यादीतील उमेदवारांमधून विहीत आरक्षणानुसार निवड यादी बनविण्यात येईल.

४) एकाच पदासाठी दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण प्राप्त झाल्यास खालील प्राधान्यक्रमानुसार उमेदवाराची अंतिम निवड केली जाईल:–

अ) अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार, त्यानंतर

ब) मागासवर्गीय उमेदवाराबाबत प्रथम अनुसूचित जमातीमधील नंतर अनुसूचित जाती, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग या क्रमाने; त्यानंतर

क) शारीरिकदृष्ट्या अपंग असलेले उमेदवार, त्यानंतर

ड) माजी सैनिक असलेले व त्यानंतर

इ) स्वातंत्र सैनिकांचे पाल्य असलेले उमेदवार;त्यानंतर

ई) वयोमान (वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवाराचा क्रम वरती लागेल)

वरील प्रत्येक संवर्गामध्ये महिलांना अग्रक्रम देण्यात येईल.

५) गुणवत्ते नुसार तसेच विहीत आरक्षणानुसार निवड यादीतील उमेदवारांना, नियुक्ती साठी उपलब्ध पदांच्या संख्येस अनुसरून संवर्ग निहाय एकास पाच या प्रमाणातच मुलाखतीसाठी बोलाविले जाईल.

६) मुलाखतीस एकंदर २० गुण असतील. ऑनलॉईन / लेखी परीक्षा व मुलाखत यांच्या एकत्रित गुण संख्येनुसार संवर्ग निहाय गुणवत्ता धारक उमेदवारांची नेमणूकीसाठी निवड करण्यात येईल.

**८ ऑनलॉईन / लेखी परीक्षा खालिल विषयांच्या नुसार घेण्यात येईल**

| | | |
|---|---|---|
| Part 1 | General knowledge, aptitude test and English language comprehensive skills | 30 Marks |
| Part 2 | Basic skills in Science and Engineering | 20 Marks |

Part 3 Environmental Legislation, Air, Water and Waste management, General issues in Environment 30 Marks

९ ऑनलॉईन / लेखी परीक्षेसाठी अभ्यासक्रम खालिल प्रमाणे असेल

**Part 1**

A <u>General Knowledge</u>

i. Current events of nation and international importance

ii. Indian and World Geography

iii. Indian Polity and Governance- Constitution and Political System

B <u>Aptitude test</u>

i. Logical reasoning and analytical ability

ii. Decision making and problem solving

iii. General mental ability

C <u>English language comprehensive skills</u>- Class 12$^{th}$ level

**Part2**

<u>Basic skills in Science and Engineering</u>

A Mathematics – 12$^{th}$ Class level

i. Probability- Definition of probability and sampling theorems, Conditional Probability.

ii. Statistics- Mean, median, mode and standard deviation, Normal distributions.

iii Common Functions, Algebraic Equations and their graphical representation.

iv. Surface area and Volumes

v. Graphical representation and Interpretation of data.

B Chemistry– 12th Class level

i. Basic Chemistry

ii. Gas Laws

iii Electro Chemistry

iv Fuels and combustion

v Metallurgical Operations

**Part 3**

Environmental Legislation, Air, Water and Waste management, General issues in Environment

A Environmental Legislation

i. Provisions of Water (Prevention & Control of Pollution) Act, 1974.

ii. Provisions of Air (Prevention & Control of Pollution) Act, 1981.

iii. Provisions of Environmental (Protection) Act, 1986.

iv. Provisions of National Green Tribunal Act, 2010.

B Air, Water and Waste Management

i. Air Pollution-

- Natural and anthropogenic sources of air pollution.
- Primary and secondary pollutants.
- Design and technical aspects of air pollution control systems/ units their operation.

ii. Water Pollution-

- Sources of water pollutions and its characteristics.
- Design and technical aspects for the waste water treatments.
- Disposal Methods of waste water.

iii. Waste Management-

- Municipal Solid waste management.
- Bio Medical Waste management.
- E-waste Management.

C <u>General Issues in Environment</u>

i. Climate Change

ii. International treaties and Protocols related to Environment.

iii. Green Buildings and Energy efficiency.

iv. Renewable Energy.

v. Eco-sensitive area.

vi. Reduce, Reuse, Recycle and Zero Discharge concept.

१०. **उमेदवारांकरिता सूचनाः—**

१. स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, परिक्षेचे स्वरुप, तारीख व ठिकाणात बदल करणे, पदसंख्या,अनुशेष व आरक्षण यात वाढ किंवा घट करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहील व त्यांचा निर्णय अंतिम राहील. त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही. भरती प्रक्रियेसंर्दभात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

२. उमेदवारांचे अर्ज ऑनलॉईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज सादर करताना अर्हताविषयक व इतर प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नसले तरी ऑनलॉईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व सत्य माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलॉईन पध्दतीने अर्ज भरताना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास व भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील व त्याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार येणार नाही. ऑनलॉईन अर्जामध्ये भरलेली माहिती बदलता येणार नाही. उमेदवारांनी जाहिरातीत नमूद सर्व अटी तसेच शैक्षणिक अर्हता उपलब्ध आरक्षण, वयोमर्यादा शिथिलीकरण इत्यादी पात्रता तपासून व खात्री करुनच ऑनलॉईन अर्ज भरावा.

३. उमेदवारांची परीक्षा ही त्यांनी ऑनलॉईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी/छाननी न करता घेतली जाणार असल्याने या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवाराची पात्रता निश्चित करण्यात येईल. ऑनलॉईन/लेखी परिक्षेतील गुणवत्तेच्या आधारे, उमेदवारांनी ऑनलॉईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिद्ध करुन उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद केले जाईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार मंडळ प्रशासनाकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

४. परिक्षेच्या वेळी परीक्षा केंद्रात किंवा परीक्षा परिसरात मोबाईल, गणकयंत्र (कॅलक्युलेटर), आयपॅड, तत्सम इलेक्ट्रॉनिक यंत्रे किंवा इतर संपर्काची साधने वापरण्यास मनाई आहे.

५. ऑनलॉईन प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन उमेदवारांची यादी परीक्षेकरिता संकेतस्थळावर दर्शविण्यात येईल.

६. उमेदवारांना ऑनलॉईन अर्ज भरण्यासंबंधी अडचणी असल्यास वर नमूद दूरध्वनी क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

७. आवश्यकतेप्रमाणे परीक्षा केंद्रामध्ये/स्थळामध्ये वाढ/बदल करण्याचे अधिकार मंडळ प्रशासनाकडे राहतील. परीक्षेचे ठिकाण, वेळ,दिनांक उक्त संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील.

८. परीक्षेचे प्रवेश पत्र उक्त संकेतस्थळावरुन स्वत: डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी पूर्णपणे उमेदवाराची राहील. प्रवेश पत्र इतर कोणत्याही पद्धतीने पाठविले जाणार नाही.

९. पात्र उमेदवारांचा अंतिम निकाल उक्त संकेतस्थळावर जाहिर करण्यात येईल.

**११. सर्वसाधारण अटी**

१. नियुक्तीपूर्वी मूळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे,शाळा सोडल्याचा दाखला, अनुभवाचा दाखला, जात प्रमाणपत्र, सन २०१३–१४ साठी वैध असलेला नॉन क्रिमीलेअर दाखला (आवश्यक त्या प्रवर्गासाठी), तसेच समांतर आरक्षणांतर्गत अर्ज करणाऱ्या उमेदवारांचे सक्षम प्राधिकारी यांचेकडील प्रमाणप्रत्र/दाखला त्याचप्रमाणे इतर आवश्यक ती मूळ कागदपत्रे इत्यादीची छाननी नियुक्ती प्राधिकारी यांचे स्तरावर केली जाईल. मूळ कागदपत्रांची तपासणी झाल्यानंतरच नियुक्तीस पात्र उमेदवारांना बोलविण्यात येईल. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्रह्य धरल्या जाणार नाही. छाननी अंती वरील प्रमाणपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास/माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही/नियुक्ती रद्द होईल.

२. सदर नियुक्त्यांसाठी परिविक्षा कालावधी २ वर्षाचा राहील.

३. मंडळाच्या सेवेतील कर्मचाऱ्यांनी त्यांचा अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने विहीत मार्गाने विहीत मुदतीत अधिकृत संकेतस्थळावरुन ऑनलॉईन भरावा व अशा परवानगीची प्रत कर्मचाऱ्यांकडे असणे आवश्यक आहे व ती कागदपत्रे छाननीवेळी सादर करावी.

४. वरील संवर्गातील ज्या प्रवर्गासाठी रिक्त पद नाही अशा उमेदवारांनी खुल्या प्रवर्गातून अर्ज करावेत.

५. निवड सूचीमधून ज्येष्ठतेनुसार उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस झाल्यानंतर शिफारस झालेला उमेदवार सदर पदावर हजर न झाल्यास किंवा संबंधित पदाच्या सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार किंवा जाती प्रमाणपत्र किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास निवड सूचीतील अतिरिक्त उमेदवारांची निवड करण्यात येईल.

६. कोणत्याही कारणास्तव सदर जाहिरातील दर्शविण्याात आलेली पदे अथवा सदरहू जाहिरात रद्द करण्याचा अधिकार मंडळ प्रशासन राखून ठेवत आहे.

**१२ सदर भरती प्रक्रियेसाठी मंडळाच्या राज्यातील कोणत्याही कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी तसेच अशासकीय व्यक्ती यापैकी कोणाचीही अभिकर्ता/माध्यम म्हणून नियुक्ती केलेली नाही. नोकरीस लावून देण्याचे आमिष देऊन फसवणूक करणाऱ्यांपासून तसेच तोतयागिरीपासून अर्जदाराने सावध रहावे, असा प्रकार निदर्शनास आल्यास वरील पत्त्यावर कळविण्यात यावे. सदर भरती प्रक्रियेसाठी निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.**